# 'ॲक्वा लाईन'चे डबे चकचकीत अन् स्मार्ट



**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई मेट्रो-३ च्या डब्यांच्या प्रतिकृतीचे अनावरण राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शुक्रवारी झाले. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने (एमएमआरसी)मेट्रो-३ चे डबे बनविण्याचे काम ॲलस्टॉम ट्रान्सपोर्ट इंडिया लिमिटेड या कंपनीला दिले आहे. मेट्रो-३ भूमिगत मर्गिका असून या मार्गाला ॲक्वा लाईन संबोधले जाणार आहे. या नावाला अनुसरूनच डब्यांची रंगसंगती निवडण्यात आली आहे. फिका हिरवा (ॲक्वा ग्रीन) आणि फिका पिवळा(बेज) रंगाचा वापर करण्यात आला असून त्यापैकी हिरवा रंग समुद्राच्या लाटांचा प्रवाहीपणा, ताजेपणा आणि गती तसेच पिवळा रंग हा आरामदायी प्रवासाचे प्रतीक आहे.

मेट्रो-३ मार्गिकेसाठी आठ डब्यांच्या एकूण ३१ गाड्या ॲलस्टॉम कंत्राटाद्वारे बनविण्यात येणार आहेत. केंद्र सरकारच्या मेक इन इंडिया या संकल्पनेप्रमाणे मेट्रो-३ च्या सर्व गाड्यांची निर्मिती श्रीसिटी, आंध्र प्रदेश येथील कारखान्यात होत आहे.

## असे असतील मेट्रो-३ चे डबे



- वातानुकूलितसह आर्द्रता नियंत्रण, सुरक्षित आरामदायी प्रवास
- प्रवाशांच्या मनोरंजनासाठी व जाहिरातीसाठी एलसीडीचा वापर
- डिजिटल मार्गिकेचा नकाशा
- प्रवाशांसाठी उद्घोषकांचा वापर
- सुंदर बैठकव्यवस्थेसह उभे राहण्यासाठी खांबांची व्यवस्था
- दिव्यांग प्रवाशांसाठी व्हील चेअर ठेवण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था
- अद्ययावत एअर सस्पेन्शनचा वापर
- प्रत्येक डब्यात सीसीटीव्ही
- अग्निशमन, धूर आणि अग्निरोधक यंत्रणा
- आपत्कालीन परिस्थितीत प्रवासी व ट्रेन नियंत्रक यांच्यात संवाद राहण्यासाठी ध्वनीसंवाद यंत्रणा

मेट्रो-३ च्या डब्याच्या निर्मितीच्या कामाला नोव्हेंबर २०१९ पासून सुरुवात होणार असून पहिली गाडी एका वर्षाच्या आत मुंबईत दाखल होणे अपेक्षित आहे. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते या डब्याच्या प्रतिकृतीचे अनावरण होणे हा आनंदाचा प्रसंग आहे.

**अश्विनी भिडे**, व्यवस्थापकीय संचालक, एमएमआरसीएल